सत्यमेव जयते

# निवडणूक वार्ता

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

जुलै २०१६
अंक दुसरा



लोकशाही व्यवस्थेत निवडणुका हे जनमताच्या अभिव्यक्तीचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या संपूर्ण व्यवस्थेचे महत्त्वाचे अधिष्ठान म्हणून स्थापित झाले आहे. त्यांच्या संचलनासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्य निवडणूक आयोगाची भूमिका त्यामुळे अतिशय मोलाची सिद्ध झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाची यंत्रणा आणि त्याच्याशी संबंधित घटकांमध्ये सुसंवाद साधण्यासाठी 'निवडणूक वार्ता' हे नियतकालिक प्रभावी माध्यम ठरू शकेल. त्यामुळेच हा उपक्रम प्रशंसनीय आहे.

**– श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर 'निवडणूक वार्ता' प्रकाशित करण्याचा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. उत्तम संपादकीय संस्कारामुळे हा अंक अत्यंत दर्जेदार झाला आहे. मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी जनजागृतीबरोबरच निवडणुकांची कार्यपद्धती व आयोगाच्या विविध उपक्रमांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत प्रभाविपणे पोहचविण्याच्या कामात 'निवडणूक वार्ता' विशेष भूमिका बजावेल. पुढील अंक अधिक दर्जेदार, संदर्भ व संग्राह्यमूल्य असलेले असतील, असा विश्वास आहे.

**– श्री. धनंजय मुंडे,**
विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील घटना व घडामोडींचा आढावा घेणारा अंक दर सहा महिन्यांनी प्रकाशित करण्यात येणारे असल्याचे समजून आनंद झाला. यात समाविष्ट माहिती खूपच उपयुक्त आहे. लोकशाहीचा पाया भक्कम करणाऱ्या या निवडणुका निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी ही माहिती सहायभूत ठरेल.

**– श्री. चंद्रकांत पाटील,** मंत्री,
सार्वजनिक बांधकाम व सहकार, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाच्या 'निवडणूक वार्ता' या प्रथम अंकाचे मन:पूर्वक स्वागत. या अंकातील निवडणूक आयोग, आयोगाचा दर्जा, सर्वोच्च न्यायालयाचा निकाल, निवडणूक रणधुमाळी, तुमच्या प्रश्नाला क्षणात उत्तर याबाबतची माहिती आकर्षक आहे. हा अंक मतदारांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरेल. त्यास चंद्रपूर शहरवासियांतर्फे शुभेच्छा!

**– सौ. राखी संजय कंचर्लावार,**
महापौर, चंद्रपूर

# सेतू संवादाचा



राज्य निवडणूक आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'चा दुसरा अंक आपल्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. नवीन उपक्रमाचा आरंभ करताना असलेल्या उत्साहात सातत्य असणे महत्त्वाचे असते. निवडणूक वार्ताचा दुसरा अंक म्हणजे आमचे सातत्य कायम राखले जाईल, याचे हे निदर्शक आहे. त्यासाठी मी आयोगातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. पहिल्या अंकाचे मा. राज्यपाल श्री. विद्यासागर राव यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यांनी या उपक्रमाचे केलेले कौतुक आम्हाला उभारी देणारे आहे. निवडणुकांशी संबंधित अधिकाऱ्यांनी आणि नागरिकांनीही पहिल्या अंकाचे चांगले स्वागत केले. अनेकांनी त्याबाबत उत्स्फूर्त प्रतिक्रियाही दिल्या. त्या प्रतिक्रियांचा आम्ही या अंकात समावेश केला आहे.

दुसऱ्या अंकात १ जानेवारी ते ३० जून २०१६ या कालावधीत राज्य निवडणूक आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील घटना घडामोडींचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेतला आहे. बृहन्मुंबई वगळून इतर सर्व महानगरपालिका आणि नगरपरिषदांसाठी बहुसदस्यीय पद्धत; तसेच नगराध्यक्षांची थेट निवडणूक ही तरतूद या कालावधीतील सर्वांत महत्त्वाची नोंद म्हणावी लागेल. याबाबत राज्य शासनाने १९ मे २०१६ रोजी अध्यादेश निर्गमित केला आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने आगामी निवडणुकांसाठी नियोजन सुरू केले आहे.

नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत १० महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या; तसेच मुदती संपणाऱ्या १९५ आणि १९ नवनिर्मित नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर सध्या या निवडणुकांच्या तयारीची लगबग सुरू आहे. नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आम्ही जाहीर केला आहे. या सर्व घडामोडींचा या अंकात थोडक्यात आढावा घेतला आहे.

निवडणूक वार्ताच्या दुसऱ्या अंकाचेही पहिल्या अंकाप्रमाणे उत्स्फूर्त स्वागत होईल. त्यांच्यातील संदर्भ मूल्यांमुळे तो सर्व संबंधितांसाठी उपयुक्त ठरेल आणि संवादाचा हा सेतू आणखी बळकट होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

**ज. स. सहारिया**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

## मार्गदर्शन आणि संकल्पना

**श्री. ज. स. सहारिया**
**राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र**

## मुख्य संपादक

**श्री. जे. पी. गुप्ता**
सचिव, राज्य निवडणूक आयोग

## संपादकीय मंडळ

**श्री. प्र. बा. दांडेकर**
उपसचिव

**श्री. ध. मा. कानेड**
उपसचिव

**श्री. नि. ज. वागळे**
अवर सचिव

**श्री. अविनाश सणस**
सहायक आयुक्त

**श्री. के. सूर्यकृष्णमूर्ती**
सहायक आयुक्त

**श्रीमती दीप्ती पाटील**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी

**श्रीमती आरती सरवदे**
तहसीलदार

**श्रीमती मनीषा मोहिते**
तहसीलदार

**श्री. अतुल जाधव**
कक्ष अधिकारी

**श्री. संजय हेंद्रे**
कक्ष अधिकारी

**श्री. संजय सावंत**
कक्ष अधिकारी

**श्रीमती रत्नप्रभा बेले**
कक्ष अधिकारी

**श्रीमती राजेश्वरी देशपांडे**
लेखा अधिकारी

**श्रीमती मनीषा माने**
सांख्यिकी अधिकारी

## कार्यकारी संपादक

**श्री. जगदीश मोरे,** जनसंपर्क अधिकारी


## अनुक्रमणिका


- 'निवडणूक वार्ता'चे प्रकाशन / ५
- सिंहावलोकन : जानेवारी ते जून २०१६ / ६
- वेध आगामी निवडणुकांचे / ९
- निर्भय, मुक्त व पारदर्शकतेसाठी... / १२
- विभागीय कार्यशाळा / १३
- बहुसदस्यीय पद्धत / १४
- आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने... / १४
- नगरपरिषद प्रभाग रचना कार्यक्रम / १५
- मतदार जागृती अभियान / १६
- राजकीय पक्षांची नोंदणी रद्द / १८
- ...तर उमेदवार अपात्र / १८
- संशोधनास चालना / १९
- जयस्वाल समितीची नियुक्ती / २१
- सुलभ संवादासाठी आणखी एक पाऊल / २१
- कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण / २२



✻ या अंकातील माहिती
३० जून २०१६ अखेरपर्यंतची आहे.

प्रकाशक :
राज्य निवडणूक आयोग, पहिला माळा,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई– ३२.

# 'निवडणूक वार्ता'चे प्रकाशन

राज्य निवडणूक आयोगाने तयार केलेल्या 'निवडणूक वार्ता'च्या पहिल्या अंकाचे मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव हस्ते २५ एप्रिल २०१६ रोजी प्रकाशन झाले. मुंबई येथील राजभवनात अत्यंत आटोपशीर आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रकाशन समारंभ पार पडला. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे तत्कालीन सचिव डॉ. प्रदीप व्यास, राज्यपालांचे सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उपसचिव परिमल सिंह आदी यावेळी उपस्थित होते.

''निवडणूक वार्ताच्या स्वरुपात न्यूज लेटर प्रकाशित करण्याचा आयोगाचा उपक्रम पारदर्शकतेसाठी उपयुक्त ठरणारा आहे. तो एक चांगला दस्ताऐवज ठरू शकतो. देशात स्वातंत्र्यानंतर लोकशाही रुजली आणि ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर लोकशाहीला आणखी बळकटी प्राप्त झाली असली तरी आपल्या लोकशाही मूल्यांना फार मोठी परंपरा आहे. ही परंपरा जपण्याकरिता अधिकाधिक लोकांनी मतदान करणे आवश्यक आहे. त्याकरिता मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी युवा वर्गाला अठराव्या वाढदिवसानंतर मतदार ओळखपत्र भेट स्वरुपात द्यायला हवे,'' असे प्रतिपादन मा. राज्यपाल महोदयांनी याप्रसंगी केले.

''मतदार यादी तयार करण्याचे काम भारत निवडणूक आयोगाच्या वतीने केले जाते. तीच यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रभागनिहाय तयार केली जाते; परंतु मतदार नोंदणीसाठी राज्य निवडणूक आयोगातर्फे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यावर आम्ही भर आहे. त्यादृष्टीने मा. राज्यपाल महोदयांची सूचना निश्चितच मार्गदर्शक ठरणारी आहे,'' असे मा. आयुक्तांनी संगितले.



मुंबई येथील राजभवनात राज्य निवडणूक आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'च्या पहिल्या अंकाचे मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते २५ एप्रिल २०१६ रोजी प्रकाशन झाले. यावेळी उपस्थित राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया व इतर अधिकारी.

### 'निवडणूक वार्ता' देशात प्रथमच

राज्य निवडणूक आयोगातर्फे 'निवडणूक वार्ता'च्या स्वरुपात 'न्यूज लेटर' प्रकाशित करण्याचा हा प्रयोग देशभरात पहिल्यांदाच आपल्या राज्यात होत असल्याचे राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी सांगितले. या अंकात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील घटना, घडामोडी, निवडणूक कार्यक्रम आदींचा समावेश आहे.

# सिंहावलोकन : जानेवारी ते जून २०१६

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मुदती वेगवेगळ्या वेळी संपत असतात. मुदती संपण्यापूर्वी त्यांच्या निवडणुका घेणे घटनात्मकदृष्ट्या बंधनकारक असते. त्याचबरोबर रिक्त पदांसाठीदेखील वेळोवेळी पोटनिवडणुका घ्याव्या लागतात. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर सातत्याने निवडणूक प्रक्रिया सुरु असते.

## महानगरपालिका

- महानगरपालिका निवडणुकांसंदर्भात गेल्या सहा महिन्यांचा आढावा घेतल्यास १० जानेवारी २०१६ आणि १७ एप्रिल २०१६ रोजी महानगरपालिकांमधील रिक्त पदांकरिता पोटनिवडणुका घेण्यात आल्या.
- औरंगाबाद महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक एप्रिल २०१५ मध्ये झाली. त्यानंतर सातारा-देवळाईचा औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात समावेश करून हद्द वाढ करण्यात आली. या हद्द वाढ क्षेत्रातील दोन प्रभागांची निवडणूक १७ एप्रिल २०१६ रोजी घेण्यात आली.
- कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक नोव्हेंबर २०१५ मध्ये घेण्यात आली. या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी प्रभाग क्रमांक ११४ व प्रभाग क्रमांक ११९ मध्ये एकही नामनिर्देशनपत्र प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे या दोन प्रभागांची निवडणूक १७ एप्रिल, २०१६ रोजी घेण्यात आली.
- नवी मुंबई महानगरपालिकेच्या रिक्त पदांसाठी जानेवारी व एप्रिल २०१६ मध्ये पोट निवडणूक झाली. यातील नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे तिथे त्याच दिवशी मतमोजणी करुन निकाल जाहीर करण्यात आला.
- लातूर महानगरपालिकेच्या पोटनिवडणुकीसाठीच्या मतदार यादीबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले होते. त्यामुळे इथल्या एका जागेचा निकाल प्रलंबित होता; परंतु त्यानंतर २२ जून २०१६ रोजी निकाल जाहीर करण्यात आला.

| मतदानाचा दिनांक | रिक्त पदांसाठी पोटनिवडणूक झालेली महानगरपालिका |
|---|---|
| १० जानेवारी, २०१६ | बृहन्मुंबई, पिंपरी-चिंचवड, अहमदनगर व नवी मुंबई |
| १७ एप्रिल, २०१६ | औरंगाबाद, कल्याण-डोंबिवली, पिंपरी-चिंचवड, अहमदनगर, सांगली-मीरज-कुपवाड, नवी मुंबई, ठाणे व लातूर |


## नगरपरिषदा व नगरपंचायती

- जानेवारी ते जून २०१६ या कालावधीत एकूण २५ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. यात बहुतांश नवनिर्मित नगरपंचायतींचा समावेश होता.
- निवडणुकांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयाकडून (अप्पर जिल्हाधिकारी) उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्याचबरोबर या कालावधीत विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील २१ रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील मतदान घेण्यात आले.

## नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांचा तपशील (जानेवारी ते जून २०१६)

| मतदानाचा दिनांक | सार्वत्रिक निवडणुका झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायती | पोट निवडणुकांची संख्या |
|---|---|---|
| १० जानेवारी २०१६ | नवनिर्मित खालापूर, तळा, माणगाव, म्हसळा, पोलादपूर, धडगाव- वडफळ्या- रोषमाळ, बु. जामखेड, शेवगाव, दिंडोरी, हिमायतनगर, नायगाव, वाशी, सेनगाव, औंढा- नागनाथ, मालेगाव, मोनोरा, गोंडपिपरी, कोरपणा व जिवती (एकूण १९) | एकूण १४ रिक्त पदांसाठी |
| १७ एप्रिल २०१६ | नवनिर्मित कुडाळ, लोणंद, माढा, माळशिरस, मोहोळ व लोहारा बु. (एकूण ६) | एकूण ८ रिक्त पदांसाठी |
| २९ मे २०१६ | निरंक | गोंदिया नगरपरिषदेतील प्रभाग क्र. १ड च्या रिक्त पदासाठी |

## जानेवारी ते जून २०१६ या कालावधील २५ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या **निवडणुकांमधील पक्षीय बलाबल (एकूण जागा ४३३)**



## जिल्हा परिषद/ पंचायत समित्या

- राज्य निवडणूक आयोगाने ११ मार्च २०१६ रोजी एकूण ४ निवडणूक विभाग व १० निर्वाचक गणांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी कार्यक्रम जाहीर केला होता.
- जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागात भारतीय जनता पक्ष, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी आणि अपक्षास प्रत्येकी एक जागा मिळाली.
- पंचायत समितीच्या निर्वाचक गणांमध्ये सर्वाधिक पाच जागा इंडियन नॅशनल काँग्रेसला मिळाल्या. भारतीय जनता पक्षाला दोन व नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी आणि अपक्षास प्रत्येकी एक जागा मिळाली. एक जागा आयोगाकडील नोंदणीकृत पक्षाला मिळाली.

## ग्रामपंचायत

- आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार राज्यातील २८ जिल्ह्यांमधील १ हजार १५१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १७ एप्रिल २०१६ रोजी मतदान झाले. या सर्व ग्रामपंचायतींची मे २०१६ ते ऑगस्ट २०१६ या कालावधीत मुदत संपणार होती.
- ग्रामपंचायतींच्या या निवडणुकांमध्ये सरासरी ७९.५२ टक्के मतदान झाले. सातारा जिल्ह्यात सर्वाधिक ९०.४४ टक्के मतदान झाले. सर्वात कमी ६५.७६ टक्के मतदान वाशीम जिल्ह्यात झाले.
- सर्व ठिकाणी १८ एप्रिल २०१६ रोजी मतमोजणी झाली व २० एप्रिल २०१६ रोजी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून निकालाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली.



# वेध आगामी निवडणुकांचे

आगामी काळात मोठ्या संख्येने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुदती संपत आहेत. त्यामुळे मार्च २०१७ अखेर जवळपास संपूर्ण राज्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. राज्यातील एकूण ८,९२,१८,४१६ लोकसंख्येशी निगडीत या निवडणुका असतील. एकूण लोकसंख्येचा विचार करता ही व्याप्ती सुमारे ९० टक्के लोकसंख्येपर्यंत असेल. त्यामुळे या निवडणुकांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या निवडणुकांची राज्य निवडणूक आयोगाने पूर्वतयारी सुरू केली आहे.

या निवडणुकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती आणि नागपूर या दहा महानगरपालिकांचाही समावेश आहे. या निवडणूक प्रक्रियेचे संगणकीकरण सुरु आहे. त्यासाठी प्रत्येक महानगरपालिकेमध्ये संगणकाची महिती असलेला एक अधिकारी नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात आलेला आहे. निवडणूक प्रक्रियेच्या संगणकीकरणाच्या कामात या अधिकाऱ्यामार्फत समन्वय साधण्यात येणार आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांचा तपशील

| स्थानिक स्वराज्य संस्थांची नावे | स्थानिक स्वराज्य संस्थांची एकूण संख्या | अंदाजित लोकसंख्या | अंदाजित सदस्य संख्या | मुदत समाप्ती |
|---|---|---|---|---|
| नगरपरिषदा/ नगरपंचायती | १९५ + १९ = २१४ | ९६,०७,१५६ | ४८१५ | डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ |
| महानगरपालिका | १० | २,५७,१९,०९३ | १२६८ | मार्च २०१७ |
| जिल्हा परिषदा | २६ | ५,३८,९२,१६७ | १५७५ | मार्च २०१७ |
| पंचायत समित्या | २९६ | | ३१२० | मार्च २०१७ |

## निवडणूक होणाऱ्या नगरपरिषदा व नगरपंचायतींची नावे

### कोकण विभाग

**रायगडः** १) पनवेल २) खोपोली ३) उरण ४) पेण ५) अलिबाग, ६) मुरुड-जंजिरा ७) रोहा ८) श्रीवर्धन ९) महाड १०) माथेरान गिरीस्थान. **रत्नागिरीः** १) चिपळूण २) रत्नागिरी ३) दापोली न.पं. ४) खेड ५) राजापूर. **सिंधुदुर्गः** १) वेंगुर्ले २) सावंतवाडी ३) मालवण ४) देवगड-जामसंडे न.पं.(नवनिर्मित). **पालघरः** १) विक्रमगड न.पं २) मोखाडा न.पं (नवनिर्मित) ३) तलासरी न.पं (नवनिर्मित).

## पुणे विभाग

**पुणे**: १) बारामती २) तळेगाव-दाभाडे ३) लोणावळा ४) दौंड ५) जुन्नर ६) शिरुर (घोडनदी) ७) आळंदी ८) सासवड ९) जेजुरी १०) इंदापूर. **सातारा**: १) सातारा २) फलटण ३) कराड ४) वाई ५) म्हसवड ६) रहिमतपूर ७) महाबळेश्वर गिरीस्थान ८) पाचगणी गिरीस्थान ९) कोरगाव न.पं (नवनिर्मित) १०) मेढा न.पं (नवनिर्मित) ११) पाटण न.पं (नवनिर्मित) १२) वडूज न.पं (नवनिर्मित) १३) खंडाळा न.पं (नवनिर्मित) १४) दहिवडी न.पं (नवनिर्मित). **सांगली**: १) ईस्लामपूर २) विटा ३) आष्टा ४) तासगाव ५) कवठे महांकाळ न.पं (नवनिर्मित) ६) कडेगाव न.पं (नवनिर्मित) ७) खानापूर न.पं (नवनिर्मित) ८) शिराळा न.पं (नवनिर्मित) ९) पलूस (नवनिर्मित). **कोल्हापूर**: १) इचलकरंजी २) जयसिंपूर ३) मलकापूर ४) वडगाव ५) कुरुंदवाड ६) कागल ७) मुरगुड ८) गडहिंग्लज ९) पन्हाळा गिरीस्थान **सोलापूर**: १) बार्शी २) पंढरपूर ३) अक्कलकोट ४) करमाळा ५) कुर्डुवाडी ६) सांगोला ७) मंगळवेढा ८) मैदर्गी ९) दुधनी.

## नाशिक विभाग

**नाशिक**: १) मनमाड २) सिन्नर ३) येवला ४) सटाणा ५) नांदगाव ६) भगूर. **अहमदनगर**: १) संगमनेर २) कोपरगाव ३) श्रीरामपूर ४) शिर्डी न.पं. ५) राहता पिंपलस ६) पाथर्डी ७) राहुरी ८) देवळाली प्रवरा. **जळगाव**: १) भुसावळ २) चोपडा ३) अमळनेर ४) चाळीसगाव ५) पाचोरा ६) यावल ७) फैजपूर ८) सावदा ९) रावेर १०) एरंडोल ११) धरणगाव १२) पारोळा १३) बोदवड न.पं (नवनिर्मित). **धुळे**: १) शिरपूर - वरवाडे २) दोंडाईचा - वरवाडे. **नंदुरबार**: १) शहादा.

## औरंगाबाद विभाग

**औरंगाबाद**: १) कन्नड २) वैजापूर ३) पैठण ४) गंगापूर ५) खुल्ताबाद. **बीड**: १) बीड २) माजलगाव ३) परळी-वैजनाथ ४) अंबेजोगाई ५) गेवराई ६) किल्लेधारुर. **नांदेड**: १) देगलूर २) माहूर न.पं. ३) अर्धापूर न.प ४) उमरी ५) धर्माबाद ६) हदगाव ७) मुदखेड ८) कुंडलवाडी ९) बिलोली १०) कंधार ११) मुखेड. **उस्मानाबाद**: १) उस्मानाबाद २) परांडा ३) भूम ४) कळंब ५) तुळजापूर ६) नळदुर्ग ७) मुरुम ८) उमरगा. **लातूर**: १) उदगीर २) अहमदपूर ३) औसा ४) निलंगा. **परभणी**: १) गंगाखेड २) सेलू ३) जिंतूर ४) मानवत ५) पाथरी ६) सोनपेठ ७) पूर्णा. **हिंगोली**: १) हिंगोली २) बसमतनगर ३) कळमनुरी. **जालना**: १)जालना २) भोकरदन ३) अंबड ४) परतूर.

## अमरावती विभाग

**अमरावती**: १) अचलपूर २) अंजनगाव सुर्जी ३) वरुड, ४) चांदूरबाजार, ५) मोर्शी ६) शेंदूरजना घाट ७) दर्यापूर ८) चांदूर रेल्वे ९) धामणगाव रेल्वे. **वाशीम**: १) कारंजा २) वाशीम ३) मंगळूरपीर. **अकोला**: १) अकोट २) बाळापूर ३) मूर्तिजापूर ४) तेल्हारा ५) पातूर. **यवतमाळ**: १) यवतमाळ २) दिग्रस ३) पुसद ४) उमरखेड ५) वणी ६) घाटंजी ७) आर्णी ८) दारव्हा. **बुलढाणा**: १) शेगाव २) नांदुरा ३) मलकापूर ४) खामगाव ५) मेहकर ६) चिखली ७) बुलढाणा ८) जळगाव-जामोद ९) देऊळगाव राजा.

## नागपूर विभाग

**नागपूर**: १) काटोल २) कामठी ३) उमरेड ४) नरखेड ५) कळमेश्वर ६) मोहपा ७) सावनेर ८) खापा ९) रामटेक. **वर्धा**: १) वर्धा २) हिंगणघाट ३) आर्वी ४) सिंदी ५) पुलगाव ६) देवळी. **भंडारा**: १) भंडारा २) तुमसर ३) पवनी ४) साकोली न.प. (नवनिर्मित). **चंद्रपूर**: १) बल्लारपूर २) वरोरा ३) मूल ४) राजुरा ५) सिंदेवाही न.पं (नवनिर्मित) ६) नागभीड न.प. (नवनिर्मित). **गोंदिया**: १) गोंदिया २) तिरोरा. **गडचिरोली**: १) गडचिरोली २) देसाईगंज.

## निवडणूक होणाऱ्या महानगरपालिकांचा तपशील

| अ. क्र. | महानगर-पालिका | मागील निवडणूक दि. | मुदत समाप्तीचा दि. | अ. क्र. | महानगर-पालिका | मागील निवडणूक दि. | मुदत समाप्तीचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बृहन्मुंबई | १६ फेब्रुवारी १२ | ८ मार्च १७ | ६. | पिंपरी- चिंचवड | १६ फेब्रुवारी १२ | १२ मार्च १७ |
| २. | ठाणे | १६ फेब्रुवारी १२ | ५ मार्च १७ | ७. | सोलापूर | १६ फेब्रुवारी १२ | ५ मार्च १७ |
| ३. | उल्हासनगर | १६ फेब्रुवारी १२ | ३ एप्रिल१७ | ८. | अमरावती | १६ फेब्रुवारी १२ | ८ मार्च १७ |
| ४. | नाशिक | १६ फेब्रुवारी १२ | १४ मार्च१७ | ९. | अकोला | १६ फेब्रुवारी १२ | ८ मार्च १७ |
| ५. | पुणे | १६ फेब्रुवारी १२ | १४ मार्च १७ | १०. | नागपूर | १६ फेब्रुवारी १२ | ४ मार्च १७ |

## निवडणूक होणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा परिषद | प. सं. संख्या | अ. क्र. | जिल्हा परिषद | प. सं. संख्या | अ. क्र. | जिल्हा परिषद | प. सं. संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रायगड | १५ | १०. | सोलापूर | ११ | १९. | लातूर | १० |
| २. | रत्नागिरी | ९ | ११. | कोल्हापूर | १२ | २०. | अमरावती | १० |
| ३. | सिंधुदुर्ग | ८ | १२. | औरंगाबाद | ९ | २१. | बुलडाणा | १३ |
| ४. | नाशिक | १५ | १३. | जालना | ८ | २२. | यवतमाळ | १६ |
| ५. | जळगाव | १५ | १४. | परभणी | ९ | २३. | नागपूर | १३ |
| ६. | अहमदनगर | १४ | १५. | हिंगोली | ५ | २४. | वर्धा | ८ |
| ७. | पुणे | १३ | १६. | बीड | ११ | २५. | चंद्रपूर | १५ |
| ८. | सातारा | ११ | १७. | नांदेड | १६ | २६. | गडचिरोली | १२ |
| ९. | सांगली | १० | १८. | उस्मानाबाद | ८ | **एकूण** | **२६** | **२९६** |

**जि. प. / पं. स.ची मागील निवडणूक :** ७ फेब्रुवारी २०१२, **जि. प. मुदत समाप्ती :** २१ मार्च २०१७, **पं. स. मुदत समाप्ती :** १३ मार्च २०१७

# निर्भय, मुक्त व पारदर्शकतेसाठी...

राज्यामध्ये मार्च २०१७ पूर्वी मोठ्याप्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुदती संपत आहेत. तत्पूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे घटनात्मकदृष्ट्या बंधनकारक आहे. ही निवडणूक प्रक्रिया साधारणत: तीन प्रमुख टप्प्यांमध्ये विभागलेली असते, ते पुढीलप्रमाणे:

**१** प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती

**२** मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन

**३** प्रत्यक्ष निवडणूक (नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यापासून ते निकालापर्यंत)

या तीन टप्प्यांच्या कामाची व्याप्ती लक्षात घेता, प्रभाग रचना व आरक्षण निश्चितीची कार्यवाही मुदत संपण्यापूर्वी सहा महिने अगोदरपासून सुरू करावी लागते. १९५ नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या मुदत संपण्याचा कालावधी लक्षात घेतल्यास १ जून २०१६ पासून प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरू करणे अपेक्षित आहे; तर महानगरपालिका, जिल्हा परिषद/ पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेची प्रक्रिया १ सप्टेंबर २०१६ पासून सुरू करावी लागेल. संविधानिक बाबींच्या पालनात कुठल्याही प्रकारचा व्यत्यय येऊ नये म्हणून सर्व संबंधिताना सजग करणे आवश्यक असते. त्यासाठी आयोगाने वेळोवेळी पत्राद्वारे काही ठळक बाबी शासनाच्या निर्दर्शनास आणून दिल्या आहेत.

### शासनास पत्र...

- नगरपरिषद व नगरपंचायतींच्या हद्दीमध्ये १ जून २०१६ नंतर बदल करू नये.
- महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हद्दीत १ सप्टेंबर २०१६ नंतर बदल करू नये.
- निवडणुकीशी संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत आयोगाच्या आदेशांप्रमाणे कार्यवाही करावी.
- जिल्हा परिषद व पंचायती समित्यांच्या निवडणुकांसाठी पुरेशा निधीची तरतूद करावी.
- आर्थिक स्थिती लक्षात घेऊन काही नगरपंचायतींना निधी उपलब्ध करून द्यावा.
- आयोगाच्या २९ डिसेंबर २०११ च्या आदेशातील तरतुदींचे काटेकोर पालन व्हावे.
- चार महिन्यांचा आचारसंहितेचा संभाव्य कालावधी लक्षात घेऊन प्रशासकीयदृष्ट्या नियोजन करावे.



# विभागीय कार्यशाळा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचालन आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगाकडे आहे; परंतु या निवडणुकांशी संबंधित बहुतांश जबाबदारी आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान केली आहे आणि जिल्हाधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विभागीय आयुक्तांवर सोपविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने आगामी निवडणुकांच्या पूर्वतयारीसाठी विभागीय स्तरावर विभागाच्या मुख्यालयात कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. मा. राज्य निवडणूक आयुक्तयांनी स्वत: उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह निवडणुकांशी संबंधित अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. या कार्यशाळांमध्ये विविध अधिकाऱ्यांनी निवडणूक विषयक तयारीबाबत सादरीकरण केले. त्याचबरोबर आगामी निवडणुकांची तयारी, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त असलेली पदे, निवडणूक खर्च व जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा हिशोब ठेवणे, निवडणुकांचे दस्तऐवज (डॉक्युमेन्टेशन) तयार करणे, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निधीची तरतूद करणे, निवडणुकीशी निगडीत अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे, बिनचूक व अद्ययावत मतदार याद्या तयार करणे, नवनवीन कल्पक योजना राबविणे, निवडणूकविषयक कामांबाबत हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरूद्ध कार्यवाही करणे इत्यादीं विषयांवर कार्यशाळेमध्ये तपशीलवार चर्चा झाली.

## विभागीय कार्याशाळांचा तपशील

| विभाग | दिनांक |
|---|---|
| अमरावती | १६ फेब्रुवारी २०१६ |
| नागपूर | १७ फेब्रुवारी २०१६ |
| पुणे | २६ फेब्रुवारी २०१६ |
| औरंगाबाद | ७ मार्च २०१६ |
| नाशिक | १८ मार्च २०१६ |



औरंगाबाद येथील कार्यशाळा.

# बहुसदस्यीय पद्धत

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील प्रचलित तरतुदीनुसार महानगरपालिका व नगरपरिषदेच्या निवडणुका एक सदस्यीय पद्धतीने घेण्यात येत होत्या; परंतु त्यात सुधारणा करून आता बहुसदस्यीय पद्धतीची तरतूद करण्यात आली आहे. त्याबाबत १९ मे २०१६ रोजी अध्यादेश निर्गमित करण्यात आला आहे. बृहन्मुंबई वगळून इतर महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक प्रभाग चार सदस्यांचा असेल. मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक किंवा दोन प्रभाग तीन सदस्यांचे असतील अथवा एक प्रभाग पाच सदस्यांचा असेल. प्रत्येक मतदाराला त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या सदस्य संख्येइतकी मते द्यावी लागतील. बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूक मात्र एक सदस्यीय पद्धतीनेच घेण्यात येईल.

नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी एक प्रभाग दोन सदस्यांचा असेल. सर्व प्रभाग दोन सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन सदस्यांचा करण्यात येईल. प्रत्येक मतदाराला आपल्या प्रभागातील सदस्य संख्येइतकी म्हणजे दोन किंवा तीन आणि एक मत थेट निवडून द्यावयाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासाठी द्यावे लागेल. अशाप्रकारे नगरपरिषदा निवडणुकीसाठी कमीतकमी तीन व जास्तीत जास्त चार मते द्यावी लागतील. नगरपंचायतींच्या निवडणुका एक सदस्यीय पद्धतीनुसारच होतील.

### नगराध्यक्षाची थेट निवडणूक

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार आता नगराध्यक्षांची निवडणूक थेट मतदारांमार्फत करण्यात येणार आहे. यापूर्वी नगरपरिषदेच्या सदस्यांमधून नगराध्यक्षांची निवड केली जात असे. नगरपरिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असणारा प्रत्येक नागरिक नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवू शकेल.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने...

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक प्रक्रियेचे अधिकाधिक संगणकीकरण आणि आधुनिकीकरणाच्या दिशेने राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वीच पावले उचलली आहेत. त्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाऑनलाईन यांच्या सहयोगाने नवनवीन संगणक प्रणाली विकासित करण्याचे काम सुरू आहे. बॉम्बे स्टॉक एक्चेंजने ऑनलाईनच्या क्षेत्रात उल्लेखनीय पावले टाकली आहेत. त्यामुळे बॉम्बे स्टॉक एक्चेंजच्या संबंधित तज्ज्ञांशी समन्वय साधला आहे.

संगणकीकरण आणि आधुनिकीकरणाचा एक भाग म्हणून २१४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना करताना गुगल मॅपचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रभागनिहाय मतदार यादीचेही संगणक प्रणालीद्वारे विभाजन करण्यात येणार आहे. नामनिर्देशनपत्रे संकेतस्थळाद्वारे भरण्याची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# नगरपरिषद व नगरपंचायत प्रभाग रचना कार्यक्रम



डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या १९५ व नवनिर्मित १९ नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या नोव्हेंबर-डिसेंबर २०१६ मध्ये होणाऱ्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. नगरपरिषदांसाठी बहुसदस्यीय पद्धतीनुसार नियोजन करण्यात आले आहे. सन २०११ च्या जनगणनेच्या आधारावर सदस्य संख्येची निश्चिती, प्रभाग रचना व आरक्षण ठरविण्यात येणार आहे.

नगरपरिषद, नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी १० सप्टेंबर २०१६ रोजी अस्तित्वात येणारी विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. या यादीत नाव असलेल्या मतदारांनाच या निवडणुकांमध्ये मतदान करता येईल. विधानसभेची मतदार यादी नगरपरिषद, नगरपंचायतींच्या प्रभागांमध्ये विभागण्यात येईल.

## प्रभाग रचना कार्यक्रमाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| मुख्याधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रारूप प्रभाग रचना सादर करणे | : | २४ जून २०१६ |
| जिल्हाधिकाऱ्याने प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता देणे | : | २९ जून २०१६ |
| सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत काढणे | : | २ जुलै २०१६ |
| प्रारूप प्रभाग रचना व आरक्षणाबाबतची माहिती प्रसिद्ध करणे | : | ५ जुलै २०१६ |
| हरकती व सूचना दाखल करण्यास सुरूवात | : | ५ जुलै २०१६ |
| हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत | : | १४ जुलै २०१६ |
| हरकती व सूचनांवर जिल्हाधिकाऱ्यांनी सुनावणी देणे | : | २७ जुलै २०१६ |
| जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविणे | : | २ ऑगस्ट २०१६ |
| विभागीय आयुक्तांकडून अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे | : | १० ऑगस्ट २०१६ |
| अंतिम प्रभाग रचना जाहीर करणे | : | १६ ऑगस्ट २०१६ |

# मतदार जागृती

भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदार संघाचीच मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाते. याची सर्व जनतेला माहिती व्हावी व वयाची १८ वर्षे पूर्ण करणारी कुठलीही व्यक्ती मतदानापासून वंचित राहू नये या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने व्यापक प्रमाणात मतदार जागृती अभियान हाती घेण्यात आले आहे. हे अभियान प्रामुख्याने दोन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. पहिला टप्पा मतदार नोंदणीसाठी; तर दुसरा टप्पा मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी असेल.


स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या दृष्टीने मतदार जागृती अभियानाची दिशा व रूपरेषा निश्चित करण्यासाठी; तसेच मतदार जागृती साहित्य तयार करण्याकरिता समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमांतून मतदार जागृतीसाठी ठाणे महानगरपालिकेने विविध माध्यमांकरिता जाहिराती व व्हिडिओ क्लिप्स तयार केल्या आहेत. ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त संदीप माळवी यांनी अत्यंत कल्पक असे जाहिरात नमुने तयार केले आहेत. नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकांसाठी १० सप्टेंबर २०१६ रोजी अस्तित्वात येणारी विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्यासाठी या यादीत मतदारांनी ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत नावे नोंदविणे आवश्यक आहे, तरच त्यांना या निवडणुकीत मतदान करता येईल. याबाबत नागरिकांना माहिती व्हावी म्हणून निवडणूक होत असलेल्या सर्व संबंधित नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात व्यापक प्रमाणात मतदार जागृती अभियान राबविले गेले. त्यासाठी प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया, पथनाट्ये, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग इत्यादींचा अवलंब करण्यात आला.

## मतदार जागृती अभियान समिती

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. जे. पी. गुप्ता, सचिव, राज्य निवडणूक आयोग. | अध्यक्ष |
| २ | मा. महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी, बृहन्मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर महानगरपालिका. | सदस्य |
| ३ | श्री. शिरीष मोहोड, उपमुख्य निवडणूक अधिकारी, सा.प्र.वि, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ४ | डॉ. संजय रानडे, संज्ञापन व पत्रकारिता विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| ५ | श्री. पंकज आठवले, ट्रान्समिशन एक्झिकेटीव्ह, मुंबई विद्यापीठ, मुंबई. | |
| ६ | श्री. अजित रानडे, ए.डी.आर., मुंबई. | सदस्य |
| ७ | श्री. भीम रासकर, आर.एस.सी.डी., नवी मुंबई. | सदस्य |
| ८ | श्री. जगदीश मोरे, जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई. | सदस्य सचिव |


...नगरपरिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक- २०१६
१ जानेवारी २०१६ रोजी आपणांस १८ वर्षे पूर्ण झाली असतील तर...
३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत मतदार नोंदणीसाठी अर्ज करा व मतदार यादीत नाव नोंदवा!
आणि हो, लक्षात ठेवा!
विधानसभा मतदारसंघाचीच मतदार यादी नगरपरिषद निवडणुकीसाठी वापरली जाणार आहे.
अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. अथवा मतदान नोंदणी अधिकाऱ्याकडे संपर्क साधा!
https://ceo.maharashtra.gov.in
1800-22-1950
(टोल फ्री हेल्पलाईन)
मतदार यादीत नाव नोंदवा!
मतदानाचा अधिकार मिळवा!!


...नगरपरिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक- २०१६
आपले नाव विधानसभा मतदार यादीत आहे का?
नसेल तर ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत अर्ज करा व आपले नाव नोंदवा!
आणि हो, लक्षात ठेवा!
विधानसभा मतदारसंघाचीच मतदार यादी नगरपरिषद निवडणुकीसाठी वापरली जाणार आहे.
अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या.
अथवा मतदान नोंदणी अधिकाऱ्याकडे संपर्क साधा!
https://ceo.maharashtra.gov.in 1800-22-1950 (टोल फ्री हेल्पलाईन)
मतदार यादीत नाव नोंदवा! मतदानाचा अधिकार मिळवा!!


...नगरपरिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक- २०१६
१ जानेवारी २०१६ रोजी आपणास १८ वर्षे पूर्ण झाली असतील तर...
३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत मतदार नोंदणीसाठी अर्ज करा व मतदार यादीत नाव नोंदवा!
आणि हो, लक्षात ठेवा!
विधानसभा मतदारसंघाचीच मतदार यादी नगरपरिषद निवडणुकीसाठी वापरली जाणार आहे.
अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. अथवा मतदान नोंदणी अधिकाऱ्याकडे संपर्क साधा!
https://ceo.maharashtra.gov.in
1800-22-1950 (टोल फ्री हेल्पलाईन)
मतदार यादीत नाव नोंदवा!
मतदानाचा अधिकार मिळवा!!

# १९३ राजकीय पक्षांची नोंदणी रद्द

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याला आयोगाचे सर्वोच्च प्राधान्य असते. त्याचबरोबर सर्व उमेदवारांना आणि राजकीय पक्षांना समान संधी उपलब्ध व्हावी; तसेच बाहुबळाचा वापर व आर्थिक बळाचा दुरुपयोग होऊ नये, या उद्देशाने 'राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००४ व २००९' आणि 'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९' नुसार राज्य निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षांची नोंदणी करण्यात येते.

राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत चिन्ह वाटपात प्राधान्य मिळते. राजकीय पक्षांना मान्यता देण्याचे काम मात्र भारत निवडणूक आयोगाकडून केले जाते. भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्यास त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेले निवडणूक चिन्ह आरक्षित केले जाते.

राज्य निवडणूक आयोगाकडे एकूण ३५९ राजकीय पक्षांची नोंदणी झाली आहे. त्यात १७ मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचा समावेश आहे. उर्वरित सर्व ३४२ अमान्यताप्राप्त पक्षांचा समावेश आहे. या सर्व पक्षांना राज्य निवडणूक आयोगाकडे दरवर्षी विवरणपत्र आणि लेखा परीक्षित लेख्याची प्रत सादर करणे आवश्यक असते. त्याची पूर्तता न करणाऱ्या ३२६ अमान्यताप्राप्त पक्षांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या. त्यानंतरही कागदपत्रे सादर न केल्यामुळे एकूण १९३ राजकीय पक्षांची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाने रद्द केली आहे.

## ...तर उमेदवार अपात्र

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचे निकाल लागल्यापासून ३० दिवसांपर्यंत उमेदवारांना निवडणूक खर्चाचा हिशेब महानगरपालिकेसाठी महानगरपालिका आयुक्त; तर इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे. मुदतीत खर्चाचा हिशेब सादर न केल्यास संबंधित उमेदवारास अपत्र ठरविण्यात येते.



निवडणूक खर्चाचा हिशेब वेळेत सादर न करणाऱ्या उमेदवारांवर तत्परतेने कारवाई करावी, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगाने जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्तांना दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करतानाच उमेदवारांना याबाबत सूचना देण्यात येतात.

# संशोधनास चालना

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात अल्पप्रमाणात संशोधन झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन मा. राज्य निवडणूक आयुक्तानी संशोधना चालना देण्याचा मानस व्यक्त केला होता. त्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या दोन वेळा आयोगाच्या कार्यालयात बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकांमध्ये संशोधनाबाबत तपशीलवार चर्चा झाली.


बैठकीला संबोधित करताना मा. आयुक्त म्हणाले की, विद्यापीठांनी दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबंधी संशोधन प्रकल्प हाती घ्यावेत. त्याचबरोबर विद्यापीठांमध्ये नियमित उपक्रमांचा भाग म्हणून आयोजित केल्या जाणाऱ्या संशोधन परिषदांसाठी आणि संशोधन निबंधांसाठीदेखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विषय घेण्यात यावा. दरवर्षी मोठ्यासंख्येने विद्यार्थी पीएचडी व एमफीलसाठी नोंदणी करत असतात, त्यांनादेखील हा विषय सूचवावा.

संशोधनाबरोबरच मतदार जागृतीसाठीदेखील विद्यापीठांनी सहकार्य करावे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांमधून ॲम्बेसेडर नियुक्त करावेत. महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये मतदार नोंदणी केंद्र सुरू करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना एक कर्मचारी अथवा शिक्षक मदतीसाठी उपलब्ध करून द्यावा. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यापीठांतील व महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांचे नाव मतदार यादीत नोंदविले गेले पाहिजे, असेही मा. आयुक्तांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात किमान दोन संशोधन प्रकल्पांना विद्यापीठांच्या माध्यमांतून चालना देण्यात येईल, असे यावेळी कुलगुरुंनी सांगितले.

राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाऱ्याने आणि 'यशदा'च्या मदतीने पुणे येथील गोखले इंन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲंड इकॉनॉमिक्सने 'Electoral  Functional Dynamics of Zilla Parishadas and Panchayat Samitis in Maharashtra' या विषयावर संशोधन केले आहे. त्याचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. श्रीमती मानसी फडके यांनी व त्यांच्या चमूने हा संशोधन प्रकल्प पूर्ण केला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे 'Contesting Municipal Elections: Motivations  Strategies' या विषयावर संशोधन करण्यात येत आहे. डॉ. सुरेंद्र जोंधळे व डॉ. मृदुल निळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संजय पाटील हे संशोधन करीत आहेत.



विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंशी झालेल्या चर्चेनंतर संशोधनास आणखी चालना देण्यासाठी आणि संशोधनाचे ढोबळ विषय निश्चित करण्याकरिता आयोगाच्या पातळीवर संशोधन समिती गठीत करण्यात आली आहे, ती अशी:

१. डॉ. संजय रानडे, संज्ञापन व पत्रकारिता विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
२. डॉ. चित्रा रेडकर, राज्यशास्त्र विभागप्रमुख, एस.एन.डी.टी., महिला विद्यापीठ, मुंबई.
३. श्रीमती मानसी फडके, गोखले इंन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे.
४. श्री. संजय पाटील, राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
५. श्री. के. सूर्यकृष्णमूर्ती, सहायक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई. (समन्वयक)
६. श्री. जगदीश मोरे, जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.



मुंबई येथील मंत्रालयासमोरील नवीन प्रशासकीय भवनाच्या आवारात शुक्रवारी (ता. १ जुलै) वन महोत्सवांतर्गत राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, लोकायुक्त म. ल. टहलियानी, उपलोकायुक्त डॉ. शेलेशकुमार शर्मा, राज्य माहिती आयुत्त अजितकुमार जैन आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# जयस्वाल समितीची नियुक्ती

स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भातील विविध पाच अधिनियमांतील निवडणूक विषयक तरतुदींमध्ये एकसुसूत्रता आणण्यासाठी; तसेच प्रशासकीय सुधारणा सूचविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

पिंप्री-चिंचवड महानगरपालिका आयुक्त आर. आर. जाधव, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी उदय चौधरी, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी अविनाश सुभेदार, अप्पर मुद्रांक नियंत्रक चंद्रकांत फुलकुंडवार व नवी मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त अ. र. पटणीगिरी यांचा या समितीत समावेश होता. यांच्यासह अन्य सहा निमंत्रित सदस्यही होते. ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी समितीचे समन्वयक म्हणून काम पाहिले.


### समितीच्या काही ठळक शिफारस

- विविध अधिनियमांतील तरतुदींमध्ये समानता असावी
- सदस्यांच्या अनर्हतेचा कालावधी सहा वर्षांचा असावा
- एका उमेदवारास दोनच जागांवर नामनिर्देशनपत्रे दाखल करता यावीत
- उमेदवारांसाठी दहावी ही शैक्षणिक अर्हता असावी
- उमेदवारांची खर्च मर्यादा तीन पटीने वाढवावी.
- न्यायप्रविष्ठ नसलेली कागदपत्रे एका वर्षात नष्ट करावीत.

# संवादासाठी आणखी एक पाऊल

राज्य निवडणूक आयोगाच्या पातळीवर सातत्याने कुठल्यातरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू असते. त्याची वेगवगळ्या टप्प्यांवरील माहिती सर्वसंबंधित निवडणूक यंत्रणा, राजकीय पक्ष, उमेदवार व प्रसारमाध्यमांना होणे आवश्यक असते. त्यासाठी संवाद सेतू म्हणून संकेतस्थळ, ई-मेल, व्हॉट्सप इत्यादींचा आधार घेतला जातो. प्रसंगी पत्रकार परिषदांचेही आयोजन केले जाते.

संवाद साधण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग केला जात असताना आता त्यात ब्लॉगमुळे आणखी एका नव्या माध्यमाची भर पडली आहे. वेळोवेळी आयोगाकडून निर्गमित केली जाणारी प्रसिद्धिपत्रके https://mahasecnews.blogspot.in या ब्लॉगवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना संदर्भ म्हणून हा ब्लॉक उपयुक्त ठरू शकेल.



# कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुदती वेगवेगळ्या वेळी संपतात. त्यामुळे आयोगाच्या पातळीवर सातत्याने निवडणूकविषयक प्रक्रिया सुरू असते. त्यासाठी आयोगाला लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. आयोगात जवळपास सर्वच अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहेत. तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचारी आयोगाच्या स्वत:च्या आस्थापनावरील आहेत. या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

## प्रशिक्षणाचे ठळक विषय

- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व
- औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५
- जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६२
- महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८
- राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले विविध आदेश व परिपत्रके
- महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९
- माहिती अधिकार अधिनियम, २००५
- अर्थसंकल्प व वित्तीय नियम, १९७८



राज्य निवडणूक आयोगाचा 'निवडणूक वार्ता' हा पहिला अंक प्राप्त झाला असून तो सर्व नागरिकांसाठी प्रबोधनात्मक, उपयुक्त व उत्कृष्टरीत्या तयार केला आहे. एक चांगला उपक्रम सुरू केल्याबद्दल आपले अभिनंदन.

– **श्री. संजय जयस्वाल,**
आयुक्त, ठाणे महानगरपालिका.

---

'निवडणूक वार्ता'द्वारे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील माहिती संबंधित शासकीय अधिकारी, राजकीय पक्ष, मतदार आणि राजकीय विश्लेषक यांना मिळणार आहे. हा अंक त्यांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

– **श्री. चंद्रशेखर व. ओक,** महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.

---

'निवडणूक वार्ता'मध्ये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची विभागनिहाय माहिती अतिशय उत्तम आहे. स्थानिक संस्थानिहाय जागा व आरक्षणाचा विस्तृत तपशील माहितीपूर्ण आहे. निवडणूक प्रक्रियेचे संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने टाकलेली पावले पारदर्शता व गतिमानतेला बळ देणारी आहेत. पुणे विभागातर्फे या अंकाचे स्वागत करण्यात येत आहे.

– **श्री. एस. चोकलिंगम,**
विभागीय आयुक्त, पुणे

---

राज्य निवडणूक आयोगाने सुरू केलेला निवडणूक वार्ताचा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. संदर्भ म्हणून हा अंक निश्चितच उपयुक्त ठरेल. त्याचबरोबर या अंकाच्या माध्यमांतून संग्राह्य दस्ताऐवजही तयार होईल. सर्वसामान्य मतदार, प्रसारमाध्यमे आणि निवडणूक आयोगामध्ये सुसंवाद या अंकाद्वारे साधला जाईल, असा मला विश्वास वाटतो.

– **श्री. राजाराम कानतोडे,**
पत्रकार, सोलापूर.

---


पिंपरी-चिंचवड महानगरपालिका' निवडणूक वार्ता'च्या उपक्रमाचे स्वागत करीत असून सदर अंकात नमूद माहिती अत्यंत उपयुक्त स्वरूपाची ठरणारी आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुतीयोग्य आहे. त्यास पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे अनेक सुभेच्छा.

– **श्री. दिनेश वाघमारे,** आयुक्त,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

---

राज्य निवडणूक आयोगाचे प्रथमत: अभिनंदन. 'निवडणूक वार्ता'चा अंक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ ठरेल, यात शंका नाही. पुढील अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

– **श्री. प्रभाकर तुळसीराम शिरसाट,**
मु. सोनखेड, ता. सोनखेड, जि. परभणी.




**राज्य निवडणूक आयोग**

पहिला माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई– ४०००३२.
दूरध्वनी– ०२२ २२०४६९०९
ई–मेल – sec.mh@gov.in, mahasecpro@gmail.com
संकेतस्थळ– https://mahasec.maharashtra.gov.in
ब्लॉग– https://mahasecnews.blogspot.in